# कॅनडियन एज्युकेशन कौन्सिलकडून 'प्रियदर्शनी स्कूल'चा गौरव

## शिक्षण विश्व : शहरातील 'टॉप ५' प्रीस्कूल्समध्ये स्थान

**महाईन्यूज**
**पिंपरी : पुण्यातील शिक्षणाच्या दर्जात सातत्याने आघाडीवर असलेल्या प्रियदर्शनी स्कूलने आता आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवली आहे. 'कॅनडियन एज्युकेशन कौन्सिल – इंडिया' (CEC) आणि 'कौन्सिल फॉर क्वालिटी अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन' (CQ-ECCE) तर्फे पुण्यातील 'टॉप ५' प्रीस्कूल्समध्ये प्रियदर्शनी स्कूलची निवड करण्यात आली आहे.**







या विशेष कामगिरीबद्दल कॅनडियन एज्युकेशन कौन्सिलच्या रिजनल डायरेक्टर सुनिता कृष्णन यांनी शाळेला अधिकृत भेट देऊन संस्थेचा गौरव केला. या भेटीदरम्यान सुनिता कृष्णन यांनी शाळेच्या कॅम्पसची पाहणी केली आणि येथील नाविन्यपूर्ण शैक्षणिक पद्धतींचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, "जागतिक स्तरावरील शिक्षणाचे जे निकष आहेत, त्याची पूर्तता प्रियदर्शनी स्कूल अतिशय सक्षमपणे करत आहे. हा सन्मान म्हणजे शाळेच्या संपूर्ण 'लर्निंग कम्युनिटी'ने घेतलेल्या कष्टांचे फळ आहे.या सोहळ्यासाठी 'क्युरीयस लर्नर्स प्री-स्कूल'च्या संस्थापक-संचालिका आणि CQ-ECCE पुणे विंगच्या अध्यक्षा मिस सरिता पुरस्वानी यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यांनी बालशिक्षण (EARLY CHILDHOOD EDUCATION) आणि भविष्यातील शैक्षणिक परिसंस्थेबद्दल सखोल मार्गदर्शन केले. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

> हा क्षण आमच्यासाठी एक महत्त्वाचा मैलाचा दगड आहे. या गौरवमुळे आमच्या व्हिजनला अधिक बळ मिळाले असून, आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्याच्या आमच्या ध्येयाला नवी प्रेरणा मिळाली आहे.
>
> – सारिता सिंग (CEO, प्रियदर्शनी स्कूल, आळंदी)

### पालकांकडून कौतुकाचा वर्षाव

प्रियदर्शनी स्कूलला मिळालेल्या या आंतरराष्ट्रीय मान्यतेमुळे पालक आणि शिक्षण क्षेत्रातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुण्यातील मोजक्या आणि दर्जेदार शाळांच्या यादीत मानाचे स्थान मिळाल्याने शाळेचा नावलौकिक अधिकच उंचावला आहे.

# संत साई स्कूल येथे चित्रकला व हस्तकला प्रदर्शन

**महाईन्यूज**
**पिंपरी : कलेशिवाय जीवन म्हणजे सुगंधाशिवाय फूल आणि प्राणाशिवाय शरीर या उक्तीचा प्रत्यय देणारे चित्रकला व हस्तकला प्रदर्शन संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल, भोसरी येथे दि. २१ व २२ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले.**



विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने शाळेत दरवर्षी कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या कलाकृती सादर करून प्रदर्शन अधिक आकर्षक केले.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन शाळेचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अशोकजी गोविंद नगरकर (निवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ, डी.आर.डी.ओ., पुणे) तसेच ह.भ.प. डॉ. सुभाष महाराज गेठे (एम.ए. तत्त्वज्ञान, आध्यात्मिक वक्ते) उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.नगरकर यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेमागील वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगितला, तर डॉ. सुभाष महाराज गेठे यांनी बाल चित्रकारांचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यानंतर उपस्थितांनी प्रदर्शनातील विविध कलाकृती पाहून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे भरभरून कौतुक केले.

# प्रियदर्शनी स्कूल मोशीच्या प्रीती महाजन यांचा विशेष लेख

**महाईन्यूज**
**पिंपरी : आजच्या शिक्षण प्रणालीत विद्यार्थी एका मोठ्या दुविधेला सामोरे जात आहेत. अंक अधिक महत्त्वाचे की खरे ज्ञान? सध्याच्या काळात परीक्षेचे निकाल, टक्केवारी आणि रँक यांनाच यशाचे मुख्य मापदंड मानले जाऊ लागले आहेत.**



त्यामुळे बहुतेक विद्यार्थी ज्ञानसंपादनाऐवजी जास्तीत जास्त अंक मिळवण्यावर लक्ष केंद्रित करतात.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अंकांची महत्त्वाची भूमिका असते. चांगले अंक पुढील शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून देतात. समाज, पालक आणि शाळा देखील अनेकदा विद्यार्थ्यांची क्षमता अंकीय निकषांवर मोजतात. यामुळे विद्यार्थ्यांवर चांगली कामगिरी करण्याचा ताण वाढतो. अनेक वेळा हा ताण तणाव, भीती आणि आत्मविश्वासाच्या कमतरतेचे कारण ठरतो.

दुसरीकडे, खरे ज्ञान विद्यार्थ्यांची विचारशक्ती, समज आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करते. ज्ञान केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नसून, ते जीवनानुभव, व्यवहारिक शिक्षण आणि नैतिक मूल्यांशीही जोडलेले असते. जेव्हा विद्यार्थी फक्त घोकंपट्टी करून परीक्षा पास करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यांचे ज्ञान अल्पकालीन ठरते आणि जीवनात त्याचा उपयोग मर्यादित राहतो.

या दुविधेचा सर्वात मोठा तोटा असा की सर्जनशीलता, जिज्ञासा आणि मौलिक विचारांना पुरेसे स्थान मिळत नाही. विद्यार्थी प्रश्न विचारण्याऐवजी उत्तरे पाठ करू लागतात. शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षा पास करणे नसून जीवन समजून घेणे आणि जबाबदार, सुजाण नागरिक बनणे हा असावा.

शिक्षक आणि पालकांची जबाबदारी आहे की त्यांनी विद्यार्थ्यांना अंकांसोबतच ज्ञानाचे महत्त्वही समजावून सांगावे. व्यवहारिक ज्ञान, कौशल्यविकास आणि मानसिक समतोल यांवर भर देणाऱ्या शिक्षणपद्धतीची आवश्यकता आहे. प्रकल्पकार्य, समूहचर्चा आणि अनुभवाधारित अध्यापन या दिशेने उपयुक्त ठरू शकतात.